# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com


**३५) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २८.०६.२०२४**

जिल्हा : धुळे

| मागील आठवड्यातील हवामान (२१/०६/२०२४ ते २७/०६/२०२४) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (२९/०६/२०२४ ते ०३/०७/२०२४) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | दिनांक | २९ | ३० | ०१ | ०२ | ०३ |
| | | | | | | | पाऊस (मिमी) | १६ | १० | १४ | १२ | १० |
| | | | | | | | कमाल तापमान (अंसे) | ३५ | ३४ | ३३ | ३१ | ३१ |
| | | | | | | | किमान तापमान (अंसे) | २२ | २३ | २१ | २१ | २१ |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | ८ | ८ | ८ | ८ | ८ |
| | | | | | | | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ७८ | ८१ | ८३ | ८१ | ८२ |
| | | | | | | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ७२ | ६० | ७२ | ७२ | ७२ |
| | | | | | | | वाऱ्याचा वेग (किमी/ तास) | २० | २३ | २४ | २८ | २७ |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार पुढील पाच दिवस आकाश अंशता ढगाळ राहण्याची शक्यता आहे. तसेच काही ठिकाणी अतिशय हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा. विजेच्या पूर्वानामाकरीता दामिणी ॲपचा वापर करावा |
| संदेश | | **मागील आठवड्यात धुळे जिल्ह्यात बऱ्याच ठिकाणी चांगला पाऊस झालेला आहे. त्यामुळे ज्या ठिकाणी पेरणी योग्य पुरेसा पाऊस (८० ते १०० मिमी) झाला असल्यास जमिनीतील ओल लक्षात घेऊन वाफसा आल्यानंतर पेरणी सुरू करावी.** |
| सोयाबीन | पेरणी | **वाणांची निवड:** फुले दूर्वा, फुले किमया, फुले संगम, फुले अग्रणी, फुले कल्याणी<br>**बीजप्रक्रिया:** जमिनीतून प्रसार होणाऱ्या रोगांपासून संरक्षण करण्यासाठी प्रति किलो बियाणास कार्बोक्झीन ३७.५%+थायरम ३७.५% डी.एस. ३० ग्रॅम प्रति १० किलो बियाणास चोळावे त्यानंतर ॲझोक्सिस्ट्रोबीन २.५% + थायोफिनेट मिथाईल ११.२५% + थायोमिथोक्झाम २५% एफ.एस. १०० मिली किंवा थायोमिथोक्झाम ३०% एफ.एस. १०० मिली प्रति १० किलो बियाण्यास बीजप्रक्रीया करावी त्यामुळे खोड माशी पासून रोपावस्थेत पिकाचे संरक्षण होईल. |
| कापूस | पेरणी | **वाणांची निवड:** फुले ६८८, फुले यमुना, फुले रखूमाई, फुले ४९२, फुले तरंग, फुले अस्मिता, फुले श्वेतांबरी, फुले सुमन, फुले ३८८, फुले धारा, फुले प्रभा, फुले चेतना, फुले माही, फुले एकता, फुले शुभ्रा<br>**बीजप्रक्रिया:** अप्रमाणित बियाण्यास कार्बाक्झिन ३७.५% + थायरम ३७.५% डब्ल्यू एस बुरशीनाशकाची प्रक्रिया प्रति किलो बियाण्यास ३.५ ग्रॅम या प्रमाणात करावी. त्यामुळे मुळकुज, जीवाणूजन्य करपा यांसारख्या रोगांचा प्रादुर्भाव कमी होतो. |
| तूर | पेरणी | **वाणांची निवड:** फुले तृप्ती, फुले रेणुका, पीडीकेव्ही अश्लेषा, बीएसएमआर ८५३, बीएसएमआर ७३६, बीडीएन ७११, बीडीएन ७१६, गोदावरी, भीमा, पीडीकेव्ही तारा<br>**बीजप्रक्रिया:** पेरणीपूर्वी प्रतिकिलो बियाणास ५ ग्रॅम ड्रायकोडर्मा किंवा ४ ग्रॅम कार्बोक्झीन ३७.५% + थायरम ३७.५% डब्ल्यू.एस. या संयुक्त बुरशीनाशकाची बीजप्रक्रिया करावी. यानंतर प्रत्येकी २५० ग्रॅम रायझोबियम व पी.एस.बी. जिवाणु संवर्धन १० किलो बियाण्यास गुळाच्या थंड द्रावणातून चोळावे. |
| मूग | पेरणी | **वाणांची निवड:** फुले चेतक, बीएम २००३-०२<br>**बीजप्रक्रिया:** पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास ५ ग्रॅम ट्रायकोडर्मा पावडर लावावी व त्यानंतर प्रत्येकी २५ ग्रॅम रायझोबियम व पीएसबी जीवाणूच पावडर गुळाच्या थंड पाण्यामध्ये मिसळून लावावी. मूग, उडीद या पिकांच्या बियाणासाठी चवळी गटाचे रायझोबियम जीवाणू संवर्धन वापरावे. ट्रायकोडर्मामुळे बुरशीजन्य रोगाचे नियंत्रण होते. रायझोबियम मुळे मुळावरील गाठी वाढून नत्राची उपलब्धता वाढते. |
| उडीद | पेरणी | **वाणांची निवड:** टी ए यू १, फुले राजन<br>**बीजप्रक्रिया:** पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास ५ ग्रॅम ट्रायकोडर्मा पावडर लावावी व त्यानंतर प्रत्येकी २५ ग्रॅम रायझोबियम व पीएसबी जीवाणूच पावडर गुळाच्या थंड पाण्यामध्ये मिसळून लावावी. मूग, उडीद या पिकांच्या बियाणासाठी चवळी गटाचे रायझोबियम जीवाणू संवर्धन वापरावे. ट्रायकोडर्मामुळे बुरशीजन्य रोगाचे नियंत्रण |

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com


| | | |
|---|---|---|
| | | होते. रायझोबियम मुळे मुळावरील गाठी वाढून नत्राची उपलब्धता वाढते. |
| **मका** | **पेरणी** | **वाणांची निवड:** राजर्षी, फुले महर्षी, संगम, कुबेर<br>**बीजप्रक्रिया:** पेरणीपुर्वी २ ते २.५ ग्रॅम थायरम हे बुरशीनाशक प्रति किलो बियाण्यास चोळावे. तसेच अझोटोबक्टर जीवाणु संवर्धन २५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास चोळून नंतर पेरणी करावी. |
| **सूर्यफूल** | **पेरणी** | **वाणांची निवड:** फुले भास्कर, मॉडर्न, केबीएसएच १, एलएसएफएच ३५<br>**बीज प्रक्रिया:** केवडा रोग टाळण्यासाठी ६ ग्रॅम मेटॅलॅक्झिल ३५ डब्ल्यू. एस. प्रति किलो बियाण्यास चोळावे. विषाणूजन्य (नॅक्रॉसिस) रोगाच्या प्रतिबंधासाठी थायामिथोक्झाम ३०% एफ.एस.१० मिली प्रति किलो बियाण्यास लावावे. त्यानंतर अॅझोटोबॅक्टर हे जिवाणू खत २५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास पेरणीपूर्वी लावावे. |
| **बाजरी** | **पेरणी** | **वाणांची निवड:** फुले आदिशक्ती, फुले महाशक्ती, धनशक्ती<br>**बीज प्रक्रिया:** बीजप्रक्रिया केलेले प्रमाणित बियाणे उपलब्ध नसल्यास पेरणीपूर्वी बियाण्यास २० टक्के मिठाच्या द्रावणाची प्रक्रिया करावी. त्यासाठी १० लिटर पाण्यात २ किलो मिठ विरघळावे. पाण्यावर तरंगणारे बुरशीयुक्त हलके बियाणे बाजुला काढून त्याचा नाश करावा व तळाला असलेले निरोगी आणि वजनाने जड असलेले बियाणे वेगळे करुन पाण्याने २ ते ३ वेळा धुवावे त्यानंतर सावलीत वाळवून पेरणीसाठी वापरावे |
| **भुईमुग** | **पेरणी** | **वाणांची निवड:** फुले उन्नती, जे एल-७७६, जे एल-१०८५, केडीजी-१२३, केडीजी-१२८, केडीजी-१६०<br>**बीजप्रक्रिया:** बियाण्यापासून प्रादुर्भाव होणाऱ्या व रोपावस्थेत येणाऱ्या रोगापासून पिकाचे संरक्षण करण्यासाठी पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास २.५ ग्रॅम मॅन्कोझेब किंवा ४ ग्रॅम ट्रायकोडर्मा जैविक बुरशीनाशक चोळावे. नंतर एक किलो बियाण्यास २५ ग्रॅम रायझोबीयम आणि २५ ग्रॅम स्फुरद विरघळणारे जीवाणू संवर्धक (घनरूप किंवा द्रवरूप) चोळावे बीजप्रक्रीया केलेले बियाणे सावलीत सुकवून पेरावे. |

**स्त्रोत** :
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा पाणी व्यवस्थापन प्रकल्प, मफुकृवि, राहुरी.

ठिकाण : मफुकृवि, राहुरी.
दि. : २८.०६.२०२४

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा**
**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**